
२८८६




BVBK-0402996

बा वा.
२९९६
१८/७/१४

श्री. आपटे गुरुजींना समर्पण

– त्यांच्याच कल्पनेतील ही कथा :

# एका रात्रीत देऊळ

वाचनालय शाखा
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. २९९६ दिनांक १८/७/१४
विषय क्र.

यदुनाथ थत्ते

BVBK-0402996

साधना प्रकाशन : पुणे - ४११ ०३०

एका रात्रीत देऊळ

© यदुनाथ थत्ते

पाचवी आवृत्ती : ११ जून १९९४

मुद्रक / प्रकाशक :
कुमुद करकरे
साधना प्रेस / साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

मुखपृष्ठ : प्राणेश जोशी

रेखाचित्रे : दिलीप भंडारे

किंमत . रु. १२/-

दिनांक

# १ : कनवाळू विश्वासशेट

विश्वासशेटजी त्या गावातले एक मोठे व्यापारी. धार्मिक वृत्तीचे. आपल्या संपत्तीचा विशिष्ट भाग दान म्हणून द्यायचे. दर उन्हाळ्यात पाणपोई घालीत. पाण्यासारखा धर्म नाही, असे म्हणत. मोळीविक्या बाया-बापड्यांसाठी त्यांनी सावली केली होती. मोठे प्रेमळ, कनवाळू. देवावर त्यांची श्रद्धा. म्हणत, 'जे काय मागायचे ते देवापाशी. त्याच्यापाशी आपले मनोगत सांगावे. दैन्य व्यक्त करावे. आडपडदा ठेवू नये.' त्यांचे नवससायास नेहमीच चालू असत. लोक कित्येक वेळा त्यांना नावेसुद्धा ठेवीत. म्हणत, 'आवळा देऊन कोहळा काढायची बनियाची नीती. देवालाही आमिषाने फसवू पाहता?'

शेटजी म्हणत, 'त्याला आमिष कोण दाखवणार? सूर्याला कोण दिवा दाखवील? नवस ही कृतज्ञता आहे. देव माझ्यावर उदार झाला. मलाही उदार होऊ दे. नदीतल्या पाण्याचे नदीलाच अर्घ्य देतात. ओंजळभर पाणी नदीतलेच घ्यायचे नि नदीलाच द्यायचे. ही कृतज्ञता आहे. नवस म्हणजेही कृतज्ञता. अज्ञ जनतेच्या नवसांना हसणे बरे नाही. 'अभिलाषा धरून माझ्याकडे येणाऱ्या भक्तांची भक्ती मी दृढ करतो,' असे कृष्णाने गीतेत सांगितले आहे. मागणी करणारे हीन नाहीत. तेही भक्त आहेत.

मागून मागायचे मग त्या महान दात्याजवळ का न मागा? देवासारखा उदार दाता दुसरा कोण आहे?'

लोक त्यांची टिंगल उडवीत, पण त्यांचे नवससायास, त्यांचे दानधर्म, सारे सदैव चालूच असे.

एके वर्षी विश्वासशेटजींनी खूप गूळ खरेदी केला. त्यांना वाटले : गुळाचा भाव पुढे वाढेल, फायदा होईल, पण त्या वर्षी तसे झाले नाही. गुळाचे भाव उतरत गेले. विश्वासशेटजी मनात घाबरले. मग पतितांचा उद्धार करणारा पतितपावन त्यांना आठवला. त्यांनी मनात नवस केला : 'गुळाचा भाव चढू दे. माझे नुकसान न होवो. जर फायदा झाला तर एक देऊळ बांधीन गावदेवीचे.' योगायोगाने भाव उतरण्याचे थांबले, उलट तेज होऊ लागले, कडाडू लागले. विश्वासशेटजींचा माल तेव्हाच उठला. त्यांना खूप नफा झाला!

देवाला द्यायचे ते ठेवू नये. माणसाची बुद्धी केव्हा फिरेल याचा नेम नाही, असा विश्वासशेटजींनी विचार केला. त्यांना देऊळ बांधण्याची घाई होती. देऊळ बांधायचे तर चांगली जागा पाहिजे. ते जागा शोधीत होते. पण मनासारखी जागा त्यांना मिळेना. त्यांनी आपल्या मित्रांना विचारले. प्रल्हाद शेट त्यांचे मित्र. त्यांनाही निराशेने हे सांगितले. आपल्या मित्राला आलेली निराशा पाहून प्रल्हादशेट म्हणाले : 'एक सुचवितो. पाटलांची गढी ठाऊक आहे? बखळवजा जागा आहे. थोडी उंचावर आहे. देऊळ तेथे बांधा. साऱ्या गावाला सहज देऊळ दिसेल. देवाची नजर गावावर राहील. पाटील भाविक आहेत. नाही म्हणणार नाहीत. देवळासाठी जागा देतील. आपण उद्या पाटलांकडे जाऊ.'

दुसऱ्या दिवशी प्रल्हादशेट आणि विश्वासशेट पाटलांकडे गेले. शिर्केपाटील म्हणजे गावचे राजे. त्यांनीच गाव वसविला. पूर्वी त्यांच्या दारापुढे हत्ती झुलत असे म्हणतात, पण आता गरिबी

आली होती. पाटलांचे म्हातारपण झाले होते. आपल्याकडे लोकांनी पूर्वीप्रमाणे यावे, आपल्याला रामराम करावा, असे त्यांच्या मनाला नेहमी वाटे. प्रल्हादशेटजींनी व विश्वासशेटजींनी देवळाची कल्पना पाटलांना सांगितली. पाटलांना कल्पना पटली. ते मनात म्हणाले : 'या निमित्ताने तरी गढीवर ये-जा होईल. लोक आले तर गढीची शोभा. लोकांचे पाय माझ्या जागेला लागले पाहिजेत.'

पाटलांनी जागा दिली. देवळाच्या जागेचे पैसे घेणे धर्म विकण्यासारखे होईल, असे त्यांना वाटले. पाटलांनी जागा फुकट दिली! विश्वासशेटनी विचार केला : 'पाटील पैसे घेत नाहीत. आपण घ्या तरी कसे म्हणावे? देवळाला तेवढेच जास्त पैसे खर्च करून देऊळच जरा चांगले बांधू म्हणजे झाले!' विश्वासशेटजींनी जागा नक्की केली. आता देवळाशिवाय दुसरे त्यांना सुचत नव्हते. ते पुरोहिताकडे गेले. मुहूर्त पाहिला.

दसऱ्याच्या दिवशी पायाची पहिली कुदळ टाकायची असे ठरले. चांगल्या कामाचा आरंभही चांगल्या दिवशी व्हावा!

विजयादशमीची सकाळ. घरोघरी सडारांगोळ्या झाल्या. सगळीकडे उत्साह. विश्वासशेटजींच्या उत्साहाला तर सीमाच नव्हती! आपल्यावरचा भार उतरल्यासारखे त्यांना वाटत होते. हलके वाटत होते. पहाटेच ते उठले. स्नान-पूजा त्यांनी आटोपली. साऱ्या लवाजम्यानिशी ते गढीपाशी आले. भूमीची शुद्धी केली. तिची पूजा केली. उपाध्यायाने मंत्र म्हटले. शेटजी आता अगदी खुषीत होते. शेवटी उपाध्यायाने गड्याला कुदळ दिली. त्या कुदळीचीही पूजा केली होती. ज्या साधनाने काम घ्यायचे त्या साधनालाही प्रसन्न ठेवले पाहिजे!

गड्याने कुदळ उचलली. तो आता घाव घालणार, तो एकदम खाली पडला! धावाधाव झाली. कोणी पाणी आणले. कोणी कांदा आणला. त्याला शुद्धीवर आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्याला

सावध केले. मग दुसरा गडी पुढे झाला; पण कुदळीचा घाव घालण्याच्या वेळी तोही बेशुद्ध पडला! नको नको म्हणत असताच प्रल्हादशेट पुढे झाले. पण कुदळ उगारताच तेही बेशुद्ध झाले. विश्वासशेटना फार दुःख झाले. आपण कोणत्या उत्साहाने निघालो नि हे काय झाले, असे त्यांना वाटले. सर्व सावध झाल्यावर 'ह्या जागेवर देऊळ व्हावे अशी देवाची इच्छा नाही. देवाला सेवा घ्यायची नाही.' असे विश्वासशेटजींनी निराशेने उद्‌गार काढले. सारे परतले. कोणी कोणाशी बोलत नव्हते. विश्वासशेट घरी येऊन पडून राहिले.

## २ : म्हातारीचे दर्शन

शेटजींच्या देवळाचा पाया घातला गेला नाही, ही बातमी गावात केव्हाच पसरली. प्रत्येक जण आपली बुद्धी चालवून आपल्यालाच काय ती कारणे समजली, अशा रुबाबात बोलू लागला :

'सूर्याच्या उन्हाची तिरीप लागली असेल.' एक म्हणाला.


'अरे बाबा, ती गढी भुताटकीने भारलेली आहे. नाही तर असली मोक्याची जागा का ओस पडली?' दुसऱ्याने डोके चालविले.

'गड्यांना पोटभर खायला घालील तर ना? अरे, इकडे देवधर्म करायचा नि तिकडे गरीब कुळांना नि मजुरांना पिळायचे. असले हे शेटजी! सकाळी न्याहारी न देता मजुरांना आणले धरून. पडले बिचारे झीट येऊन.' शेटजींचा एक छुपा वैरी म्हणाला.

शेटजींना दिवसभर काही सुचत नव्हते. त्यांना सकाळच्या प्रकाराचा उलगडा होत नव्हता. त्यांना जेवण गोड लागले नाही. दर वर्षी शेटजी दारावर झेंडूच्या माळा लावणे वगैरे सर्व गोष्टींत जातीने लक्ष घालीत. पण आज त्यांनी काही केले नाही. ते

सीमोल्लंघनाला गेले नाहीत की आल्यागेल्यांना त्यांनी सोने दिले नाही. शेजारच्या मुलांना त्यांनी खाऊसुद्धा दिला नाही.

रात्री ते जेवलेही नाहीत. तसेच अंथरुणावर जाऊन पडले. घरात सर्वत्र उदासीनता पसरली. मनुष्य आपल्याभोवती वातावरण पसरवीत असतो. पाण्यात कितीही बारीक दगड टाका, त्याच्याभोती वलये निर्माण होतात. माणसाचेही तसेच. एक मनुष्य उत्साही, सद्‌गुणी निघाला की सारी चक्रे फिरू लागतात. भराभर कामे होऊ लागतात. मनुष्य सद्‌गुणी की दुर्गुणी, हा त्याचा प्रश्न नाही; तो समाजाचा प्रश्न आहे. आपण सद्‌गुणी असणे, सद्‌गुणांची उपासना करणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे. आपल्यामुळे दुसरे निराश होऊ नयेत, दुःखी होऊ नयेत म्हणून विश्वासशेटजी एकांतातच दिवसभर होते. रात्री ते तसेच गादीवर पडले. जवळ समई मंद मंद जळत होती. उशाला पाण्याचे भांडे ठेवले होते. आज समईची वात पुढे सारण्याचीही शेटजींना शुद्ध राहिली नव्हती. शेटजींना विचार करता करताच झोप लागली.



मध्यरात्र उलटली. एकाएकी तांब्यावरच्या भांड्याचा आवाज झाला. शेटजींनी डोळे किलकिले केले तो भांडे तांब्यावरून खाली पडलेले. अन् हे काय? हे तांब्यातून काय निघाले? एक म्हातारी त्या तांब्यातून बाहेर आली! दिसायला अत्यंत जखखड. साऱ्या शरीरावर सुरकुत्या पडलेल्या. अंगावरचे कपडे फाटलेले. धड तिला चालताही येत नव्हते. हातात एक काठी होती. तिच्यावर रेलून ती उभी होती. शेटजींनी हे पाहिले. पण त्यांनी आपले डोळे मिटून घेतले. पण ती म्हातारी धीट दिसली. तिने त्यांना हातातल्या काठीने टोचले. शेटजींनी डोळे उघडले. म्हातारीचा आवाज क्षीण असला तरी त्यात करडेपणा होता. ती म्हणाली, 'देऊळ बांधायला निघाला होतास ना माझे? बस. थकलास इतक्यात? वा रे आरंभशूर! ऊठ, झोपलास काय? कामाला लाग. सारेच कसे आळशी नि स्वार्थी झालात रे तुम्ही? अगोदर माझे देऊळ बांधायचेच कोणाच्या मनात येत नाही आणि तुझ्यासारख्या एखाद्याच्या मनात आले, तर तो असा पहिल्याच धडाक्याने थंड होतो. पण मी तुला स्वस्थ बसू देणार नाही. ऊठ, कामाला लाग.' असे म्हणून तिने तांब्याला तीन फेऱ्या घातल्या नि ती लहान झाली आणि पुट्कन् तांब्यात उडी मारून अदृश्य झाली.

विश्वासशेट गोंधळले. त्यांना मग काही सुचेना. सकाळपासून त्यांचे मन उद्विग्न झालेले. त्यांनी विचार केला : 'मनी वसे ते स्वप्नी दिसे' म्हणतात, तसेच असेल! दिवसभर तोच देवळाचा विचार करीत होतो, त्यामुळे असले स्वप्न दिसले. पण हे सगळे स्वप्न तर नाही ना, हे पाहण्यासाठी त्यांनी स्वतःला चिमटा घेऊन पाहिला नि मनाशीच उद्गारले, 'एकूण खरे तर हे सारे!' बऱ्याच वेळाने पहाटेच्या थंड हवेत त्यांना झोप लागली.

## ३ : बिनमोलाचे देऊळ

दुसऱ्या दिवशी ते कोणाशी धड बालले नाहीत. त्यांनी आपली झोपावयाची जागा मात्र बदलली. सारा दिवस त्यांचा असाच उदासीनतेत गेला. रात्री ते नव्या जागी झोपले. मध्यरात्र उलटल्यावर आदल्या दिवसाचाच प्रकार पुन्हा घडला! तांब्याचा आवाज झाला. त्यातून ती कालचीच म्हातारी बाहेर आली. आज ती थोडी रागावलेली दिसत होती. रागानेच तिने विश्वासशेटजींना काठीने टोचले. म्हणाली, 'ऊठ, स्वस्थ झोपतोस खुशाल? कामाला लाग! आपली गावदेवता भणंगासारखी झाली याची काहीच कशी खंत नाही तुम्हांला कोणाला? अगोदर कोणाच्या मनात चांगला विचार येत नाही. एखाद्याच्या आला आणि तो असा स्वस्थ बसला तर कसे चालेल?' आणि विश्वासशेटकडे ती मान वाकडी करून पाहू लागली. तिला विश्वासशेटकडून उत्तर हवे असावेसे तिच्या चेहऱ्यावरून दिसत होते.

विश्वासशेट आदल्या रात्रीइतके आज गोंधळले नाहीत. त्यांनी धीर धरून उत्तर दिले, 'मी कोठे नको म्हणतो? पण देवीलाच सेवा घ्यायची नसावी, असे दिसते. मला तर या नवसातून कधी बाहेर पडेन असे वाटते आहे. मी तरी काय करू? माझी माणसे पाया खोदताना एकामागून एक बेशुद्ध पडली! काय आहे माझा इलाज?'

म्हातारीची मुद्रा थोडी सौम्य झाली. ती म्हणाली, 'विकत मोलाचे देऊळ मला नको. प्रेमाचे, सेवेचे देऊळ हवे. मोलाचे जिन्नस मला चालणार नाहीत. मोलाचे श्रम मला चालणार नाहीत. माझे देऊळ माझ्यावरच्या प्रेमानेच झाले पाहिजे. पैशांत मजुरी देऊन जे देऊळ होते ते धनाचे, पैशांचे देऊळ होईल. ते का माझे देऊळ? माझे देऊळ प्रेमाच्या मजुरीने झाले पाहिजे. माझ्या देवळाचा पाया प्रेमावर आधारलेला असला पाहिजे. पैशाशिवाय

प्रेमाने व आस्थेने जे मिळेल तेच मला हवे. विकतच्या देवळात मी राहणार नाही. आणि तुला स्वस्थ बसू नाही द्यायची मी देऊळ झाल्याशिवाय. ध्यानात ठेव!' इतके बोलून म्हातारीने तांब्याला तीन फेऱ्या घातल्या आणि पुटकन् उडी मारून ती तांब्यात गेली. म्हातारीच्या आजच्या आवाजात क्षीणता होती. पण करारीपणा जास्त होता. शेटजी आजच्या प्रकाराने घाबरले नाहीत, बावरले नाहीत.

भुताटकीचा हा प्रकार नाही. देवीनेच हा चमत्कार केला, याबद्दल त्यांची खात्री झाली. 'देवता एकूण मोठी खाष्ट दिसते. तिला सेवा घ्यायची आहे तर!' असा विचार करून शेटजी शांतपणे झोपी गेले. आज त्यांचा चेहरा कालच्यासारखा उतरलेला नव्हता. आज जेवणाकडे त्यांचे लक्ष होते. ते नीट जेवले. घरातल्या लोकांना साहजिकच आनंद झाला.

दुपारी शेटजींनी आपल्या मित्रमंडळींना बोलावले. त्यांनी सारी हकीकत सांगितली. काहींनी शेटजींना भ्रम झाल्याचा तर्क केला. दुसऱ्यांनी त्यांना गाव सोडून जावयाचा सल्ला दिला. काही म्हणाले, 'कसची म्हातारी घेऊन बसलात? फुकट देऊळ बांधून मागणारी असली कसली म्हातारी? घरात एवढे पैसे असताना फुकट काय म्हणून जिन्नस घ्यायचे? आणि तुमच्यासारख्यांना फुकट जिन्नस देणार तरी कोण?'

दुसरे एकजण म्हणाले, 'शेटजी, नरसोबाच्या वाडीस तुम्ही जा, सारे ठीक होईल दत्ताच्या कृपेने!'

कोणी म्हणाले, 'शेटजी, झोपायची जागा बदलून पाहा.'

त्या रात्री झोपण्याची जागा बदलली. रात्री उशागती तांब्या त्यांनी ठेवला नाही. गावाबाहेरच्या बंगल्यात ते झोपावयास आले होते. मित्रांनाही त्यांनी बरोबर नेले होते; पत्ते खेळत रात्र जागून

काढावयाची आणि कसली म्हातारी आहे ते पाहावयाचे, असा त्यांचा विचार होता. पण हळूहळू एकेक जण झोपेने पेंगू लागला आणि खेळातून पाय काढून ताणून देऊ लागला.

सर्वांना झोप लागल्यावर मध्यरात्रीला तांब्या-भांड्याचा आवाज झाला. शेटजी जागे झाले. घरचा तांब्या त्यांना उशाशीच दिसला! वरचे भांडे लवंडून खाली पडले होते. शेटजींनी मित्रांना जागे करून त्यांना झाल्या प्रकाराची सत्यता पटवून द्यायचे ठरविले. त्यांनी हाका मारण्यास सुरुवात केली. मित्र त्यांच्या जवळच झोपलेले, पण ओ देईनात! इतक्यात ती म्हातारी बाहेर आली. रोज तिच्याजवळ काठी असे. काठी टेकीत टेकीत ती बाहेर येई. आज तिच्याजवळ काठी नव्हती.

शेठजी आपल्या मित्रांना हाका मारीत आहेत हे पाहून तिच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर थोडे हसू चमकले. तिने 'विश्वासशेट' म्हणून हाक मारली आणि पुन्हा एक हास्यरेखा तिच्या चेहऱ्यावर झळकली. ती म्हणाली, 'अरे, नरसोबाच्या वाडीला जाऊन का तुझा त्रास चुकणार आहे? तुझ्याकडून देऊळ मी बांधून घेणारच! आपली ग्रामदेवता भणंगभिकाऱ्यासारखी तुम्हांला बघवते तरी कशी? कोठे गेला तुमचा तो पराक्रम, ती आस्था? तुम्हांला काही वाटेल, एक दिवस तुम्ही जागे व्हाल; आपल्या ग्रामदेवतेची आठवण तुम्हांपैकी कोणाला होईल, असे वाटले होते मला. शेकडो लोक आज माझ्याच आधारावर आहेत. त्यांची पोटे माझ्यावर, त्यांना हवापाणी माझेच मिळते. पण त्यांना किंचितही माझी आठवण होत नाही. माझ्यासाठी देऊळ बांधावे, माझी पूजा करावी, असे काही कोणाला वाटत नाही. तुमची कृतज्ञता जणू मेली! तुझे हृदय थोर म्हणून देऊळ बांधायचा विचार सुचला. पण तूही नुसता बोलघेवडाच का? असे नको होऊ देऊ. सुंदर विचार सुचला, आता सुंदर कृती होऊ दे. गावचे वैभव वाढू दे. गावदेवीचा वनवास आता संपवा. तुमचे गाव जर पुन्हा वैभवाला

न्यायचे असेल, तर उठा, कामाला लागा. कोणाचे ऐकू नका. देवळाचे सामान जमा करा. मात्र हे ध्यानात ठेवा, गावदेवीचे मंदिर गावाने प्रेमाने उभारले पाहिजे. पैशाने उभारले तर ती हमाली होईल. मला हमाली नको, सेवा हवी. सेवेत प्रेम असते. हमाली म्हणजे बिगार. भिऊ नको. कामाला लाग. मी आहे पाठीशी तुझ्या!'

असे बोलून देवी पुन्हा भांड्यात अदृश्य झाली. ती तांब्यात जाताना सूक्ष्म रूप धारण करी व पुट्दिशी आत उडी मारी नि अदृश्य होई.

## ४ : कामाला आरंभ

दुसऱ्या दिवशी शेटजी उठले ते निश्चयाने. त्यांनी स्नान, पूजा आटोपली. ते तडक लक्कडकोटात गेले. सकाळचे दूध घ्यायचीही त्यांना आज शुद्ध नव्हती! त्यांचा नेहमीचा दुकानदार ठरलेला होता. त्याच्याकडे ते गेले. शेटजींना पाहून दुकानदाराने त्यांचा आदरसत्कार केला.

शेटजी म्हणाले : 'मला देवळासाठी लाकडे हवीत, द्याल का?'

'वा, शेटजी हे काय विचारणे? सारी वखार आपलीच आहे. काढा शोधून लाकडे. आता दुपारी लावून देतो घरी.'

'बरे आहे, निवडतो. पण आजची माझी मागणी जरा वेगळी आहे. मला लाकडे हवीत; पण ती विकत नकोत, फुकट हवीत. विकत घ्यायची इच्छा आहे, शक्तीही देवदयेने आहे. पण देवीची इच्छा वेगळी. तिला मोलाचे नको. लोकांनी प्रेमानेच दिले पाहिजे. गावदेवीचे देऊळ प्रेमानेच बांधले जावे. पाहा, विचार करा. किती देता येतील ते ठरवा. ही थट्टा नव्हे. देवळाचा नाद सोडायचा

विचार केला. लोकांनीही तसा सल्ला दिला. पण ती गावची देवता. ती मला स्वस्थ बसू देत नाही! म्हणते, 'तुम्ही चैन करता पण गावदेवीची आठवण तरी होते का कधी? कधी वाटते का खंत?' ती मला झोप घेऊ देत नाही. प्रयत्न करतो आहे. तुमच्या साऱ्यांच्या मदतीवर करणार, नाही म्हणून नका.'

'बरे आहे. देवाचे काम आहे. पण दादांना विचारायला हवे.'

'धर्माच्या कामात दादा आडवे येतील? धर्माच्या कामात यथाशक्ती मदत करायला हवी. तुम्हीच मुख्त्यारीने कामे करता सारी. दोन-चार लाकडे द्यायला का दादांना विचारायला हवे?' उद्वेगाने विश्वासशेट म्हणाले.

'तुमच्या का बाहेर आहे मी शेटजी? देतो एक मोठेसे लाकूड काढून. पुढे लागले तर आणखी देऊ. न्यायची व्यवस्था तुम्ही करा म्हणजे झाले. बरे आहे. जय गोपाळ!'

'बरे आहे.' म्हणून शेटजी बाहेर पडले.

ते हमालांकडे गेले. म्हणाले, 'आपले एक काम आहे. कराल का?'

'का नाही करणार? आपलीच तर माणसे आम्ही.'

'ते खरे, पण आज हमाली मिळणार नाही. देवीच्या देवळाचे आहे ते लाकूड. देवीला मोलाचे नको. ती म्हणते, 'मला प्रेमाचे हवे, पैशाचे नको.' गावदेवीचे ऐकले तर पाहिजे ना?'

फुकट हमाली करावयाची गोष्ट काढल्यावर हमाल एकमेकांच्या तोंडाकडे पाहावयास लागले. शेवटी एक जण म्हणाला, 'धर्माचे काम आहे. देवळाचे काम का तुमच्या घरचे आहे? नाही कसे म्हणू आम्ही? पण आज सवड नाही. वेळ मिळाला की टाकू आणून. त्यात काय मोठेसे?'

'ठीक आहे. करा बरं माझं एवढं काम. मी तुमच्याच विश्वासावर आहे.' असे म्हणून विश्वासशेटजी बाहेर पडले.

त्यांच्या एका शब्दाबरोबर शंभर लाकडे त्यांच्या घरी येऊन पडती. पण त्याच शेटजींना आज स्वतःची खरी किंमत कळली. त्यांच्या शब्दाने कामे नव्हती होत, मिळणाऱ्या पैशांच्या आशेने लोक कामे करीत. त्यांच्या धनाचा तो मान होता. मान त्यांच्या साडेतीन हातांच्या देहाच्या शब्दाला नव्हता. शेटजींच्या इशाऱ्यावर नाचणारे तेच हमाल, आज हजार बयादी सांगत होते! त्यांना आज सवड नव्हती यायला. चार पैशाने जे काम व्हायचे तेच आज आर्जवे करून होत नव्हते. शेटजी घरी आले ते विमनस्क स्थितीत. काय ही गावची स्थिती! गावदेवीचे देऊळ बांधायचे. साऱ्या गावचे ते कर्तव्य. पण कोणाचेच लक्ष त्याकडे नाही. कर्तव्याची जाणीव करून द्यायची तर ते काम कोण दगदगीचे! पण स्वस्थ बसून उपयोग नाही. आपण आता हे काम करायला हवे. पाहू, देवीची मर्जी असली तर होईल सारे. ते आज घरीच झोपले.

मध्यरात्रीनंतर पुन्हा ती म्हातारी आली! ती रोजच्यापेक्षा शेटजींच्या जास्त जवळ उभी राहिली. आज प्रथमच तिच्या चेहऱ्यावर थोडीशी प्रसन्नता दिसत होती. 'काय रे, एवढ्यातच कंटाळलास? अरे, कठीण प्रसंग तर यापुढेच यायचा आहे. माझ्या देवळाला उशीर लागला तरी चालेल, पण ते प्रेमाने बांधले गेले पाहिजे. तुझ्या हातूनच होणार आहे ते पुरे. मी आहे. घाबरू नकोस. प्रयत्न सोडशील, वैतागशीलही; पण मी तुला सोडणार नाही. तुझे काही ऐकणार नाही. तुला धंदा सुचू देणार नाही. हाती घेतलेले काम तडीस नेले पाहिजे. अगोदर चांगला विचार फारसा कोणाला सुचत नाही. ज्याला सुचला तोच स्वस्थ बसला तर कसे चालेल?' इतके बोलून ती रोजच्याप्रमाणे अदृश्य झाली.

आता शेटजींना देवळाचे वेड लागले. दुसऱ्या दिवशी ते दुकानदाराकडे गेले. त्यांनी सारी हकीकत कळकळीने सांगितली. गावदेवीला देवळाची आवश्यकता असल्याचे पटवून दिले. त्यांना देवळाशिवाय दुसरे काहीच सुचत नव्हते! हातभर लाकडासाठी ते

मैलभर जायला आता थकत नव्हते. तासभर प्रवचन करावे लागले तरी कंटाळत नव्हते. त्यांना आता गावातील आपण एक प्रतिष्ठित आहोत याची आठवणदेखील नव्हती. ते म्हणत : 'पैशाच्या लालचीने लोक माझ्या शब्दाला किंमत देतात. ती पैशाची प्रतिष्ठा. मी स्वतः लाकडे वाहिली तर माझी काय अप्रतिष्ठा होणार? अप्रतिष्ठा त्या पैशांचीच होईल. मला काय त्याचे?' आता ते स्वतः हाताने विटा वाहत. लाकडे आणीत. प्रथम प्रथम लोक टीका करीत, टिंगल करीत. म्हणत, 'फुकटात पुण्य जोडू पाहतो, धर्मावर सोमवार करू पाहतो.'



शेटजींच्या कानांवर हे येई, पण ते लक्ष देत नसत. ते म्हणत, 'ह्यांच्या टीकेच्या निमित्ताने माझ्या मनातली सारी पापे धुतली जातील.' पुढे पुढे त्यांची निष्ठा पाहून लोकांच्या मनातला संशय दूर झाला.

ती म्हातारी पुन्हा एकदा रात्री आली. त्यांना म्हणाली, 'तू एकटाच का सारे प्रयत्न करणार? तू एकट्याने देऊळ बांधले तर लोकांना त्यात काय गोडी? लोक म्हणतील तुझे देऊळ, गावदेवीचे

देऊळ असे कोणी म्हणणार नाही. तुला माझे ना देऊळ बांधायचे आहे? असा अहंकार तरी का धरतोस? गावदेवी साऱ्यांची. तिचे देऊळ साऱ्यांचे. साऱ्यांची मदत घे. दस की लकडी एक का बोजा! एकदा सगळ्यांना बोलाव, समजाव. दुसऱ्याची लहानसहान मदतही तुच्छ मानू नये. गंगा का आपल्यात येऊन मिळणाऱ्या ओहोळांना तुच्छ मानते? ती साऱ्यांचे घेते.'

म्हाताऱ्या देवतेच्या सांगण्याप्रमाणे विश्वासशेटजींनी असा एक प्रसंग जुळवून आणला. घरी सत्यनारायण केला. साऱ्या गावाला आमंत्रण दिले. लोक जमल्यावर त्यांनी आपले म्हणणे सांगितले : 'मी सारे मनमोकळेपणाने तुम्हांला सांगणार आहे. लोकांचा माल फुकट घेऊन मी देऊळ बांधणार हे खरे; पण ते देऊळ माझे नाही. ते गावदेवीचे देऊळ. गावाचे देऊळ. गावानेच ते बांधावे, अशी देवीची इच्छा. आपणा साऱ्यांची मदत मला हवी. माझेही सर्वस्व मी लावत आहे. आपण चैन करायची आणि गावदेवीला वनवासात ठेवायचे, हे बरे नाही!'

लोकांच्या मनात बदल तर झालाच होता. शेटजींच्या ह्या भाषणाने उरलेसुरले आक्षेप दूर झाले. शेटजींच्या शब्दा-शब्दांतून कळकळ जणू ओसंडत होती. आपल्या गावदेवीच्या वनवासाबद्दल बोलताना त्यांच्या डोळ्यांतून आसवे आली!

हळूहळू लोक मदतीला येऊ लागले. हमालांनी लाकडे फुकट आणून टाकली. विटा मिळाल्या. शेटजींना आता हाच एक उद्योग. दुकानाकडे, घरात त्यांचे लक्ष नव्हते. सारे लक्ष देवळाकडे.

एक वर्ष गेले. जे काम इतर करीनात ते शेटजी स्वतः करू लागले. लाकडे ते कापीत, रंधा मारीत. कित्येक वेळा काम मनासारखे न झाले तर निराश होत, पण प्रयत्न त्यांनी सोडला नाही.

लहान मुलांची मदत शेटजींना फार होई, पण ती अस्थिर स्वरूपाची. शेटजींना ते रामाचे दूत वाटत. ते त्यांच्याशी गोड

बोलत. कधी खाऊही देत. शेटजींनी मिळविलेल्या चुना, विटा मुलांनी आणून टाकल्या. माहिती असलेल्यांनी देवळाचा नकाशा काढून दिला. साऱ्या गावाला हे काम आपलेच असे आता वाटू लागले. शिष्ट, सभ्य लोक विश्वासशेटजींना वेड लागले असे म्हणत. पण निरक्षर जनता, स्त्रिया नि मुले त्यांना काय मदत हवी ते विचारीत. आता त्यांना कपड्यालत्त्याची शुद्ध नव्हती. खाण्यापिण्याकडे लक्ष नव्हते. दाढीही बोटबोट वाढलेली असे. कधी कधी कामाच्या धांदलीत ते उघडेच उपरणे घेऊन बाहेर पडत. शेटजी आता अखंड उद्योगात असत. जसजसे काम वाढू लागले तसतशी म्हातारीच्या चेहऱ्यावर कांती येऊ लागली. तजेला दिसू लागला. तिच्या चेहऱ्यावरचा रागीटपणा गेला. शेटजींना ती धीर देई.

## ५ : एका रात्रीत देऊळ

एक दिवस ती म्हातारी रात्री आली. म्हणाली, 'माझी एक अट तू जवळ जवळ पुरी केलीस. आता दुसरी सांगते. घाबरू नकोस. नीट ऐक!'

विश्वास शेट थोडेसे थकलेच होते एक अट पुरी करता करता. आता दुसरी अट काय घालते कोणास ठाऊक, असा ते विचार करीत होते.

'आता दुसरी अट पुरी केलीस तरच तुझे सारे श्रम सार्थकी लागतील. आजपर्यंत ज्या निष्ठेने काम केलेस, त्याच निष्ठेने ते पुरे कर. गावातल्या लोकांची मदत घे. कमी पडेल ते मी पुरे करून घेईन. माझे देऊळ विनापैशाने तर झाले पाहिजेच, पण ते एका रात्रीतच झाले पाहिजे. ते फार मोठे, भपकेबाज नसले तरी चालेल.'

विश्वासशेटजींनी होकार दिला. म्हणाले, 'देवीच्या इच्छेबाहेर मी नाही.'

विश्वासशेटजींनी मित्र जमविले. सारे म्हणणे त्यांच्यापुढे मांडले. ते म्हणाले, 'तुमच्या मदतीवाचून मी पंगू आहे. तुम्ही मदत करा. गावदेवीचे हे देऊळ म्हणजे तुमचेच. देवीला एका रात्रीत देऊळ बांधून हवे आहे. साऱ्यांनी प्रयत्न केले तर हे होईल.'

एक जण म्हणाला, 'मला ही देवता नाही वाटत. ती भूतपिशाच्च असेल. गावोगावी अशी अर्धवट देवळे आहेत. एका रात्रीत कोणी ती बांधू शकले नाही. पिशाच्चे देवतांच्या रूपाने वेड लावतात माणसाला. तुम्ही देवळाचा नाद सोडा!'

दुसरा म्हणाला, 'विश्वासशेटसारख्या सत्यनिष्ठ माणसाकडून सेवा घ्यायची आहे देवीला. आपण मदत केली पाहिजे त्यांन .। एका रात्रीत देऊळ बांधायचे कठीण तर आहेच, पण आपण विचार करून मार्ग काढू. विचार विश्वासशेटना सुचला असला तरी काम आपले साऱ्यांचे आहे. गावाची कळा आपण साऱ्यांनी मिळू पालटली पाहिजे.'

गावात जिकडे तिकडे त्याच गोष्टीची चर्चा चालली होती. शेटजींचे देऊळ आता त्यांचे एकट्याचे नव्हते. साऱ्या गावाचा तो प्रश्न. घरोघर त्याची चर्चा चालली होती. गावात कोणीतरी देऊळ एका रात्रीत बांधावयाची योजना मांडणारा निघेल, असा शेटजींना विश्वास वाटू लागला. उरलेसुरले किरकोळ सामान ते जमवीत होते. त्यांची वृत्ती आनंदी असे.

त्या गावात मेधावी नावाचा एक होतकरू मुलगा होता. त्याच्या मोठमोठ्या नवनव्या कल्पना असत. परंतु त्याच्या कल्पकतेची गावात कदर नव्हती. साऱ्या गावात तो एक चेष्टेचा विषय झाला होता. आपल्या कल्पना अमलात आणण्याची संधी त्याला नव्हती. त्याच्या कल्पकतेला हातभार लावणारे कोणी नव्हते. गावाच्या समोर एका रात्रीत देऊळ बांधायचा प्रश्न होता.

मेधावीच्या कानांवर तो गेला. त्याने तो प्रश्न सोडवावयाचे ठरविले. आता त्याला दुसरे काही सुचत नव्हते, देऊळ हाच त्याचा विषय झाला होता. एक दिवस त्याला हवी तशी कल्पना सापडली. कल्पनेचा त्याला फार आनंद वाटला.



मेधावीने आपली कल्पना कागदावर उतरून काढली व कागद घेऊन तो शेटजींकडे गेला. म्हणाला, 'शेटजी, तुमच्या ह्या वेडात मी दुसरा वेडा तुम्हांला मदत करणार आहे! ही पाहा माझी योजना. एका रात्रीत देऊळ होईल ह्या योजनेप्रमाणे. तुमचे मनोरथ पूर्ण होतील.'

शेटजींनी तो कागद ठेवून घेतला. त्यांनी रात्री शांतपणे तो वाचला. मेधावीची कल्पना त्यांना आवडली. त्यांना मार्ग सापडला! दुसऱ्याच दिवशी मेधावीला त्यांनी बोलावले. म्हणाले, 'मेधावी, तुमची बुद्धी खरोखर अलौकिक आहे. तुमच्याजवळ जणू सरस्वती आहे. माझे काम ह्या योजनेने होईल. तुमचे सहकार्य तेवढे मला द्या.' मेधावीला आनंद झाला. समाधान वाटले.

दुसऱ्या दिवशी गावच्या साऱ्या लोकांना विश्वासशेटजींनी

जमविले. मेधावीची योजना गावासमोर ठेवली. मेधावीने ती समजावून सांगितली. मेधावी म्हणाला, 'बंधूंनो, एका रात्रीत देऊळ बांधणे ही कल्पना वाटते तेवढी कठीण नाही. प्रयत्नांती परमेश्वर म्हणतात. आपण सारे संघटित होऊ, प्रयत्न करू, तर ते शक्य आहे. देऊळ गावदेवीचे. विश्वासशेटजींचे एकट्याचे ते नाही. आपण साऱ्यांनी त्यांना मदत केली पाहिजे.

'देवीचे म्हणणे एका रात्रीत देऊळ बांधायचे एवढेच आहे. यात पाया खोदणे कोठे येते? तो आपण आधी खोदून ठेवू. देवळाला लागणाऱ्या साऱ्या सामानाची तयारी अगोदर आपण करून ठेवू. लोकांना काम कसे करायचे ते शिकवू. आपण शिस्तीने नि संघटनेने काम केले, तर एका रात्रीत देऊळ होईल. गावदेवीचा वनवास संपेल. तिला आनंद मिळेल. खिडक्या, दारे, तुळ्या, चुना, चिखल सारे करून ठेवू.

'या कामात सर्वांची मदत लागेल. एक दिवस येऊ म्हणून चालणार नाही. अगोदर शिक्षण घेतले तर देऊळ सहज होईल.'

लोकांना मेधावीची योजना पटली. प्रश्न पायाचाच होता. मागे, कुदळ टाकताच नोकर बेशुद्ध पडले. आता पाया कसा होईल, याचीच लोकांना काळजी होती. एका रात्रीच्या कामासाठी अगोदर तयारी हवी, हे लोकांना पटले. पुन्हा मुहूर्त ठरला. पायाची पहिली कुदळ शेटजींनी टाकली, पण काही झाले नाही! तेव्हा लोकांना विश्वास आला.

काही लोक 'शेटजींच्या देवळाला आम्ही का मदत करावी?' असे म्हणाले. शेटजी अशांना परोपरीने सांगत : 'गावदेवीचे हे देऊळ. हे तुमचेच आहे. माझे काही नाही.' दुसऱ्यांनी मुलांचा वेळ जातो म्हणून ओरड केली. त्यांना काही लोक म्हणाले, 'विद्यार्थी का गावात राहत नाहीत? गावचे सुखदुःख ते त्यांचे सुखदुःख!' मग विरोधकांचा विरोध हळूहळू मावळला. कामे उत्साहाने सुरू झाली.

## ६ : उत्साही मेधावी

गावात उत्साहाचे वारे संचारले. मुले संध्याकाळी गढीपाशी जमू लागली. स्त्रियाही जेव्हा सवड मिळेल तेव्हा एकदा फेरफटका गढीकडे मारून येत.

आता मेधावी आणि इतर तरुण मुलेही तेथेच दिसू लागली. मेधावी मुलांना शिकवी. तो त्यांना गोष्टी सांगे. त्यांच्या निरानंद जीवनात आता आनंद आला होता.

देवळासाठी काही मुले गवंडी काम शिकत. काही सुतारी शिकत. म्हातारेकोतारे सुतार-गवंडी त्यांना कामाची दिशा दाखवीत. आपापल्या रोजगारानंतर इतरही येत. आस्थेने चौकशी करीत. थोडेफार शिकवीत. काम करीत. मेधावी मुलांना वळण लावीत होता. शिस्तीने कामे केली गेली की थोड्या वेळात ती यशस्वी कशी होतात याचे पाठ तो देत होता.

पंधरा दिवसांनंतर गावात मुलांकडून एक प्रचारात्मक कार्यक्रम करावयाचे ठरले. पहाटेच गावात मुलांच्या फेऱ्या निघाल्या. गाणी म्हणत, गावाला जागवीत मुले निघाली.

या सारे जण. हे काम देवीचे आहे. हे काम गावाचे आहे.

या सारे म्हातारे या. मुले या. स्त्रिया या. पुरुष या.

देवाच्या कामात चुकारपणा नको.

या, या, या!

तुम्ही या. आपली एकच वीट देवळाला लावा.

देवी तुमची, तुमच्या गावची.

तिला देऊळ हवे, पण प्रेमाचे. पैशांचे नको.

साऱ्यांच्या प्रेमाचे, गावच्या ऐक्याचे, संघटनेचे देऊळ, सुंदर, सुंदर देऊळ!

देवीला पूजा हवी. पण प्रत्येकाच्या श्रमाची.

सारे या. हातभार लावा. कोणी तुच्छ नाही. नीच नाही. या. या. या!

अशी गाणी गात मुलांच्या टोळ्या गावभर हिंडल्या. प्रत्येक गल्ली गाजली. झोपलेले जागे झाले. सारे गढीवर जमले. तेथे पाया खोदलेला होता. सारे सामान व्यवस्थित रचून ठेवले होते. लोकांना ही तयारी पाहून अचंबा वाटला. मेधावी पुढे आला. त्याने सुंदर पण थोडक्या शब्दांत सारे समजावले. संघटनेचे, शिस्तीचे महत्त्व सांगितले. एका रात्रीत देऊळ बांधायचे तर साऱ्यांनी शिकले पाहिजे. अगोदर तयारी हवी हे सांगितले.

मेधावी गल्लीगल्लीत जाई. लोकांना शिस्तीचे, वेळेवर काम करण्याचे धडे देई. सारा गाव त्याने तयार केला. साऱ्या लोकांना त्याने वळण लावले. मग देवळाचा मुहूर्त ठरला. आदल्या दिवशी रंगीत तालीम घ्यायचे ठरले. उद्या कसे काम करावयाचे, याचे थोडक्यात प्रात्यक्षिक. कोणी कसे उभे राहावयाचे, कोठे जायचे, काय काम करायचे, किती वेळ करायचे, सारे काही मेधावीने समजावून सांगितले. लोकांना ते दृश्य पाहून समाधान वाटले. आनंद झाला. एका रात्रीत देऊळ होईल याचा त्यांना विश्वास आला. सारे समाधानाने परतले.

देवळाच्या कामात कोणाचीही मदत वगळली नाही. स्त्रियांना काम होते. मुलांना काम होते. युवकांना होते. म्हाताऱ्यांना होते. शिकलेल्यांना होते. न शिकलेल्यांना होते.

## ७ : गोड दिवस

एकादशीच्या दिवशी तर गावात सगळीकडे उत्साह ओसंडत होता. सायंकाळी पाच वाजता सूचनेची घंटा झाली. साडेपाच वाजता दुसरी घंटा झाली. स्वयंसेवकांची पहिली तुकडी गावातून

प्रयाणगीते म्हणत निघाली. त्यांचे गाणे उत्साहवर्धक चालीचे, स्फूर्तिदायक होते. ते म्हणत होते –

या. या. या. सारे या. या. या!

माझी शक्ती कमी म्हणू नका. वानरांचीही सेवा गोड मानून घेणारा श्रीहरी तुमचीही गोड मानून घेईल.

तुमच्या हृदयात परमेश्वर आहे. तुम्ही निर्बल कसे असाल? आपली शक्ती कमी म्हणणे म्हणजे त्या हृदयस्थ देवाचा अपमान.

श्रद्धा ठेवा. दृढ आशा ठेवा. देव प्रसन्न होईल.

आपले मनोरथ पूर्ण करील.

देवाने ध्रुव-प्रल्हादाला नाही का शक्ती दिली?

चला, आपणही ध्रुव-प्रल्हाद होऊ.

ध्रुव-प्रल्हादाप्रमाणे निष्ठावान् होऊ.

एका रात्रीत देऊळ तर होईलच; पण ऐक्याची शक्तीही आपल्याला समजेल.

फेरी साऱ्या गावातून फिरून आली. सातापूर्वी पंधरा मिनिटे लोक आपल्या नेमलेल्या ठिकाणी जाऊन उभे राहिले. बरोबर साताच्या ठोक्याला पाया भरायला सुरुवात झाली. अर्ध्याच तासात सारा पाया भरला. टोल पडला. ती टोळी शिस्तीने दूर निघून गेली. दुसरी टोळी आली. देवळाचा लाकडी सांगाडा उभारला गेला. भिंती बांधावयाला सुरुवात झाली. धंदेवाईक गवंडी, सुतार सूचना देत होते. कामावर देखरेख करीत होते. खिडक्या बसविल्या. तासातासांनी टोळी बदले. शेटजी व मेधावी सर्वांवर देखरेख करीतच होते. त्यांच्या आनंदाला, उत्साहाला पारावार नव्हता. नकाशाप्रमाणे, वेळापत्रकाप्रमाणे सारी कामे होत होती. दिव्यांचा प्रकाश भरपूर पडला होता. कोणीही अंगचुकारपणा करीत नव्हते. पहाटे तीनला भिंती तयार झाल्या. सिंहासन तयार झाले.

ताबडतोब पटईला सुरुवात झाली.

आता फक्त कळसच राहिला! कसलेले गवंडी पुढे सरसावले. त्यांनी भराभर कळस तयार केला. त्याला चांदीचा पत्रा ठोकला. देवळावर झेंडा चढला. घंटा लागल्या. दारावर माळा लागल्या. सारी तयारी झाली. देऊळ पुरे झाले. सारे लोक विचारू लागले, 'देऊळ तयार झाले, पण देवी कुठे आहे?'

दिशा फाकल्या. विंब वर आले. पहिली किरणे गाभ्यावर पडतील अशी व्यवस्था होती. बरोबर सहा वाजता किरण आत पडले. पाहतात तो सिंहासनावर अष्टभुजा देवीची दैदीप्यमान मूर्ती लोकांना दिसली! सगळीकडे आनंदीआनंद झाला. टाळ्या वाजल्या. वाजंत्री वाजली. कोणी नारळ फोडले.

उत्साहाचा पहिला भर ओसरला. शेटजी देवीजवळ गेले. म्हणाले, 'देवी, तुझ्या इच्छेप्रमाणे गावकऱ्यांनी देऊळ बांधले आहे. प्रसन्न हो. गावाचे कल्याण कर. आता येथेच राहा.'

देवी म्हणाली, 'तुमच्या इच्छेप्रमाणे मी येथे राहीन, पण माझी एक अट आहे आणखी! माझी पूजा मोलाच्या पुजाऱ्याकडून नको. मला प्रेमाची पूजा हवी आहे. भाडोत्री काम मला नको. मला बाहेरगावचा माल नको. जेव्हा बाहेरचा माल माल मला अर्पण कराल, त्या दिवशी मी गावातून निघून जाईन. मोलाची पूजा मला देऊ पाहाल तर मी निघून जाईन. तुम्ही मुलांच्या उत्साहाला वळण लावा. त्यांचा उत्साह मारू नका. सारे ऐक्याने राहा. ऐक्य आहे तोपर्यंतच मी गावात राहीन. हे ध्यानात ठेवा. संघटना, शिस्त शिका!'

२९९६
BVBK-0402996